पुरंदरच्या विकासाची पुढील वाटचाल ही नव्या पिढीच्या भविष्याशी जोडलेली आहे. प्रस्तावित आंतरराष्ट्रीय विमानतळ, आयटी पार्क, औद्योगिक विस्तार आणि वाढते नागरीकरण यांच्या पार्श्वभूमीवर या परिसरात सक्षम पायाभूत सुविधांची उभारणी आवश्यक आहे. उद्योगांना गती, व्यवसायांना विस्तार आणि तरुणांना रोजगाराच्या संधी मिळण्यासाठी विश्वासार्ह व पुरेशा क्षमतेची वीजव्यवस्था हा मूलभूत आधार आहे. महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनीचा अर्थात महापारेषणचा सासवड-कोडीत परिसरातील ४००/२२० के.व्ही. सासवड प्रकल्प आधुनिक पुरंदरच्या उभारणीचा महत्त्वाचा आधार ठरणार आहे. या प्रकल्पातून परिसरातील वीज पारेषण क्षमता वाढणार असून भविष्यातील वाढत्या वीजमागणीची पूर्तता करण्यासाठी आवश्यक व्यवस्था बळकट होणार आहे. त्यामुळे पुरंदरच्या औद्योगिक प्रगतीला, गुंतवणुकीसाठी अनुकूल वातावरण निर्माण करण्याला आणि रोजगारक्षम अर्थव्यवस्थेच्या उभारणीला हातभार लागणार आहे. या विकासप्रक्रियेत शेतकऱ्यांचे हित, ग्रामस्थांचा विश्वास आणि स्थानिक तरुणांचा सहभाग यांना केंद्रस्थानी ठेवणे तितकेच आवश्यक आहे. वीज पारेषण व्यवस्था ही विकासाला ऊर्जा देणारी महत्त्वाची यंत्रणा आहे. वीजनिर्मिती केंद्रांतील वीज वितरण यंत्रणांपर्यंत पोहोचविण्याची जबाबदारी महापारेषण पार पाडते. औद्योगिकीकरण, शहरीकरण आणि वाढता विद्युत वापर लक्षात घेऊन या व्यवस्थेची क्षमता वेळेत वाढवावी लागते. पुरंदर परिसराच्या भविष्यातील गरजा लक्षात घेऊन सासवड प्रकल्प हाती घेण्यात आला आहे. उद्योग किंवा मोठे नागरी प्रकल्प उभे राहिल्यानंतर वीजव्यवस्थेचा विचार करण्याऐवजी त्यांच्या उभारणीला आवश्यक ऊर्जा सुविधा आधीच तयार करणे, ही दूरदृष्टीची भूमिका आहे. सासवड प्रकल्प याच भूमिकेचे महत्त्वाचे पाऊल ठरणार आहे. आज उभारण्यात येणारी पारेषण व्यवस्था पुढील अनेक वर्षांच्या विकासाला आधार देणार आहे. त्यामुळे या प्रकल्पाकडे केवळ उपकेंद्राची उभारणी म्हणून न पाहता पुरंदरच्या दीर्घकालीन आर्थिक आणि सामाजिक प्रगतीची पायाभरणी म्हणून पाहणे आवश्यक आहे. सासवड प्रकल्पांतर्गत ४००/२२० के.व्ही. क्षमतेचे एआयएस उपकेंद्र उभारण्यात येणार आहे. त्यामध्ये प्रत्येकी ५०० एमव्हीए क्षमतेचे दोन इंटरकनेक्टिंग ट्रान्सफॉर्मर असतील. त्यामुळे एकूण १,००० एमव्हीए परिवर्तन क्षमता उपलब्ध होणार आहे. यासोबत १२५ एमव्हीएआर क्षमतेचा बस रिॲक्टर आणि आवश्यक लाइन बे व इतर विद्युत उपकरणांचा समावेश आहे. भविष्यातील क्षमतावाढीसाठीही प्रकल्पात तरतूद करण्यात आली आहे. जीएसटीसह प्रकल्पाची किंमत सुमारे ७४०.७७ कोटी रुपये आहे. टॅरिफ बेस्ड कॉम्पिटिटिव्ह बिडिंग अर्थात टीबीसीबी पद्धतीने राबविण्यात येणाऱ्या या प्रकल्पासाठी 'सासवड ट्रान्समिशन लिमिटेड' ही विशेष उद्देश कंपनी स्थापन करण्यात आली असून तिचे महापारेषणकडे हस्तांतरण झाले आहे. उपलब्ध प्रकल्प माहितीनुसार, प्रकल्प पूर्णत्वाची नियोजित तारीख २५ जानेवारी २०२८ आहे. ही गुंतवणूक परिसरातील पारेषण क्षमता आणि वीजव्यवस्थेची विश्वासार्हता वाढविण्यासाठी महत्त्वाची ठरणार आहे. नियोजित वेळेत प्रकल्प पूर्ण करण्यासाठी आवश्यक परवानग्या, जागेची उपलब्धता, तांत्रिक कामे आणि स्थानिक समन्वय यांना गती देणे गरजेचे आहे. पुरंदरमधील प्रस्तावित आंतरराष्ट्रीय विमानतळामुळे परिसराच्या विकासाला नवी दिशा मिळणार आहे. विमानतळाशी संबंधित प्रवासी सेवा, मालवाहतूक, साठवणूक, हॉटेल व्यवसाय, वाहतूक आणि इतर पूरक सेवांच्या विस्तारासाठी सक्षम वीजव्यवस्था आवश्यक आहे.विमानतळावरील प्रकाशव्यवस्था, सुरक्षा यंत्रणा, दळणवळण, प्रशासकीय सुविधा आणि मालवाहतूक केंद्रे यांना उच्च विश्वासार्हतेचा वीजपुरवठा लागतो. त्यासाठी प्रादेशिक पारेषण व्यवस्था सक्षम असणे महत्त्वाचे आहे. सासवड प्रकल्पातून वाढणारी पारेषण क्षमता पुरंदर परिसरातील अशा भविष्यातील गरजांच्या पूर्ततेसाठी महत्त्वाचा आधार ठरणार आहे. विमानतळाबरोबरच वाढत्या नागरी वस्त्या, शैक्षणिक संस्था, रुग्णालये आणि व्यावसायिक आस्थापनांच्या ऊर्जेच्या गरजाही वाढणार आहेत. या विस्तारासाठी आवश्यक वीज पायाभूत सुविधा निर्माण करण्यास प्रकल्पाचा हातभार लागणार आहे.उद्योगांच्या उभारणीसाठी जमीन, रस्ते, पाणी, कुशल मनुष्यबळ आणि सक्षम वीजव्यवस्था या सुविधांची एकत्रित उपलब्धता आवश्यक असते. माहिती-तंत्रज्ञान कंपन्या, उत्पादन उद्योग आणि विविध सेवा व्यवसायांसाठी विजेची उपलब्धता हा गुंतवणुकीच्या निर्णयातील महत्त्वाचा घटक असतो. सासवड प्रकल्पामुळे परिसरातील वीज पारेषण क्षमतेत भर पडणार आहे. त्यामुळे भविष्यातील औद्योगिक आणि व्यावसायिक विस्तारासाठी आवश्यक ऊर्जा सुविधांचा पाया मजबूत होणार आहे. प्रस्तावित आयटी पार्क आणि अन्य उद्योगांच्या विकासाला पूरक वातावरण निर्माण करण्यामध्ये या प्रकल्पाची महत्त्वाची भूमिका राहणार आहे. रस्ते, वाहतूक, पाणी आणि कौशल्यविकास यांच्याशी सक्षम वीजव्यवस्थेची सांगड घातल्यास पुरंदरचा विकास अधिक नियोजनबद्ध होईल. परिसरात उद्योग आणि सेवा व्यवसायांचा विस्तार झाल्याने स्थानिक अर्थव्यवस्थेतील व्यवहार वाढतील आणि नव्या व्यवसायांना चालना मिळेल.पुरंदरच्या विकासाचा सर्वांत महत्त्वाचा लाभ स्थानिक युवक-युवतींपर्यंत पोहोचला पाहिजे. शिक्षण पूर्ण केल्यानंतर रोजगारासाठी मोठ्या शहरांकडे जाणाऱ्या तरुणांना आपल्या परिसरातच काम, व्यवसाय आणि उद्योजकतेच्या संधी मिळणे आवश्यक आहे. विमानतळ, आयटी पार्क आणि उद्योगांच्या विकासाबरोबर तांत्रिक देखभाल, वाहतूक, लॉजिस्टिक्स, संगणकीय सेवा, सुरक्षा, हॉटेल व्यवसाय, बांधकाम आणि स्थानिक पुरवठा सेवांची गरज वाढणार आहे. या संधींना आवश्यक असलेल्या ऊर्जा पायाभूत सुविधांच्या उभारणीत सासवड प्रकल्पाचा महत्त्वाचा वाटा राहणार आहे. रोजगाराच्या या संधी स्थानिक तरुणांना मिळण्यासाठी कौशल्य प्रशिक्षण, औद्योगिक प्रशिक्षण संस्था, उद्योजकता मार्गदर्शन आणि उद्योगांशी समन्वय यांवरही भर द्यावा लागेल. विद्युत तंत्रज्ञान, यंत्रसामग्री देखभाल, माहिती-तंत्रज्ञान आणि वाहतूक व्यवस्थापन यांसारख्या क्षेत्रांतील प्रशिक्षणातून युवकांची रोजगारक्षमता वाढेल. युवकांनी केवळ नोकरी शोधणारे न राहता सेवा पुरवठादार, लघुउद्योजक आणि व्यवसायनिर्माते म्हणूनही पुढे येणे आवश्यक आहे. विकासाला स्थानिक कौशल्याची जोड मिळाल्यास आधुनिक पुरंदरच्या उभारणीत नव्या पिढीचा सक्रिय सहभाग वाढणार आहे.पुरंदरची ओळख शेती, ग्रामीण जीवन आणि कष्टकरी माणसांशी जोडलेली आहे. त्यामुळे विकासाचे नियोजन करताना शेतीचे महत्त्व कायम केंद्रस्थानी ठेऊन, वाढत्या बाजारपेठांशी स्थानिक शेतमालाची जोडणी, प्रक्रिया उद्योग, साठवणूक आणि वाहतूक सुविधांचा विस्तार नियोजित आहे. अशा पूरक सुविधांना सक्षम वीजव्यवस्थेचा आधार मिळणार आहे. स्थानिक शेतकरी, बचतगट, लघुउद्योजक आणि सेवा व्यवसायांना नव्या आर्थिक घडामोडींमध्ये सहभागी करून विकासाचे लाभ अधिक व्यापक होण्याकरिता शासन प्रयत्नशील आहे. पुरंदरच्या समृद्धीचा खरा अर्थ स्थानिक कुटुंबांच्या उत्पन्नात वाढ, तरुणांच्या हाताला काम आणि ग्रामीण अर्थव्यवस्थेला स्थैर्य मिळण्यात आहे. महापारेषणच्या सासवड प्रकल्पातून उभारली जाणारी ऊर्जा पायाभूत सुविधा या व्यापक प्रयत्नांना बळ देणार आहे.

कोडीत परिसरातील काही ग्रामस्थांनी १६ ऑक्टोबर रोजी आंदोलनातून प्रकल्पासंदर्भातील आपली भूमिका मांडली. जमीन, शेतीवरील परिणाम आणि स्थानिक हिताच्या प्रश्नांना संवेदनशीलतेने हाताळणे आवश्यक आहे. ग्रामस्थांच्या भावना ऐकून घेणे आणि त्यांच्या शंकांना स्पष्ट, वस्तुनिष्ठ उत्तरे देणे ही विश्वास निर्माण करण्याची पहिली पायरी आहे. प्रकल्पाची गरज, तांत्रिक दृष्ट्या योग्य जागेची निवड, तांत्रिक बाबी, लागू प्रक्रिया आणि नुकसानभरपाईसंबंधी तरतुदी यांची माहिती संबंधित नागरिकांना स्पष्टपणे देण्यात येत आहे. संबंधित अधिकारी, लोकप्रतिनिधी, शेतकरी आणि ग्रामस्थ यांच्यात सातत्यपूर्ण संवाद सुरु आहे. त्यामुळे न्याय्य प्रश्नांचे वेळेत निराकरण, प्रक्रियेतील पारदर्शकता आणि स्थानिक सहभागातून प्रकल्पाविषयी विश्वास वाढत आहे. शेतकरीहित जपत आणि ग्रामस्थांना विश्वासात घेत पुढे जाणे हीच सर्वसमावेशक विकासाची दिशा आहे. लोकसहभागातून उभारलेली पायाभूत सुविधा पुरंदरच्या प्रगतीचा अधिक मजबूत आधार ठरणार आहे. पुरंदर आज विकासाच्या महत्त्वाच्या टप्प्यावर उभा आहे. प्रस्तावित विमानतळ, आयटी पार्क, उद्योग आणि नागरी विस्तार यांच्या गरजा लक्षात घेऊन आजच पायाभूत सुविधा उभारणे आवश्यक आहे. त्यासाठी सासवड येथील ४००/२२० के.व्ही. प्रकल्पातून वीज पारेषण व्यवस्थेला मिळणारे बळ महत्त्वाचे ठरणार आहे. या प्रकल्पामुळे आधुनिक पुरंदरच्या उभारणीला आवश्यक ऊर्जा आधार मिळणार आहे. उद्योग आणि गुंतवणुकीसाठी पोषक वातावरण निर्माण करण्यास हातभार लागणार आहे. नव्या पिढीच्या रोजगार आणि उद्योजकतेला चालना देणाऱ्या विकासप्रक्रियेला बळ मिळणार आहे. या प्रगतीचा लाभ स्थानिक शेतकरी, युवक, महिला, लघुउद्योजक आणि सर्वसामान्य नागरिकांपर्यंत पोहोचविणे ही सामूहिक जबाबदारी आहे. प्रशासनाचा समन्वय, महापारेषणची तांत्रिक क्षमता आणि ग्रामस्थांचा सहभाग यांच्या बळावर ही वाटचाल अधिक सक्षम होईल. शेतकरीहित जपत, नव्या पिढीच्या आकांक्षांना दिशा देत आणि स्थानिक सहभागातून उभा राहणारा सासवड प्रकल्प उद्याच्या आधुनिक, रोजगारक्षम आणि समृद्ध पुरंदरचा महत्त्वाचा आधार ठरणार आहे.

**(लेखक हे महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनीत (महापारेषण) जनसंपर्क अधिकारी म्हणून कार्यरत आहेत.)**


BAJAJ FINANCE

### बजाज फायनान्स लिमिटेड

**नोंदणीकृत कार्यालयः** बजाज ऑटो लिमिटेड कॉम्प्लेक्स, मुंबई - पुणे रोड, आकुर्डी, पुणे - ४११०३५
शाखा कार्यालयः बजाज फायनान्स लिमिटेड, २७१, बिझनेस पार्क, तळमजला, मॉडर्न इंडस्ट्रियल इस्टेट, वीरवानी इंडस्ट्रियल इस्टेट जवळ, वेस्टर्न एक्सप्रेस हायवे जवळ, गोरेगाव पूर्व, मुंबई-४०००६३ प्राधिकृत अधिकाऱ्याचा तपशीलः नावः श्री. हर्षद गमरे, ई-मेल आयडीः harshad.gamre bajajfinserv.in मोबाईल क्र. ९८६७९३४०७३

**परिशिष्ट-४-ए [नियम ८ (६) च्या परंतुकानुसार]**
**सरफेसी कायदा २००२ अंतर्गत ई-लिलाव विक्री नोटीस सिक्युरिटायझेशन अँड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शियल ॲसेट्स अँड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट कायदा, २००२ ("कायदा") अंतर्गत स्थावर मालमत्तेची विक्री**

याद्वारे सर्वसामान्य जनतेला आणि कर्जदार/सह-कर्जदार/गहाणखतदार यांना खाली नमूद केलेल्या सुरक्षित मालमत्तेच्या संदर्भात नोटीस देण्यात येत आहे जी बजाज फायनान्स लिमिटेड ('बीएफएल') कडे गहाण आहे, आणि जिचा ताबा कायद्याच्या तरतुदींनुसार बीएफएलच्या खालील स्वाक्षरीकर्ते प्राधिकृत अधिकाऱ्यांनी घेतला आहे, ती मालमत्ता खाली नमूद केलेल्या रकमेच्या आणि त्यापुढील लागू व्याज, प्रभार, आणि खर्च इत्यादींच्या वसुलीसाठी लिलावाद्वारे विकली जाईल.
खाली वर्णन केलेली सुरक्षित मालमत्ता खालील तपशीलवार देय रकमेच्या वसुलीसाठी सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) नियम ("नियम") च्या नियम क्र. ८ आणि ९ अंतर्गत **"जे जसे आहे जेथे आहे, जे जसे आहे तेथे आहे आणि जे काही आहे तेथे आहे"** या तत्त्वावर विकली जात आहेः

**ई-लिलावाचा तपशील**

| कर्जदार आणि सह-कर्जदाराचे नाव आणि पत्ता | **अवधेश कुमार (कर्जदार)** पत्ताः एव्हरशाईन मिलेनियम पॅराडाईज बिल्डिंग क्र. ५१, फ्लॅट क्र. ४०२, ज्युपिटर को-ऑप हाऊसिंग सोसायटी, एव्हरशाईन मिलेनियम पॅराडाईज फेज १, ठाकूर व्हिलेज, मुंबई, महाराष्ट्र ४०००६३ | विजय गगनदास मोटवानी (कर्जदार) पूजा विजय मोटवानी (सह-कर्जदार) दोघांचा पत्ताः ओशनिया ए ५०३ कासा, रिओ कल्याण शीळ रोड, डोंबिवली पूर्व ठाणे, महाराष्ट्र-४२१२०४ |
|---|---|---|
| कर्ज खाते क्रमांक | H405BLP0327464 | 4050HL36904420, 4050HL36904463 & 4050HL36904556 |
| कलम १३(२) अंतर्गत वैधानिक मागणी नोटीसची तारीख आणि रक्कम | नोटीस दिनांक २८-डिसेंबर-२४ मागणी रक्कम. रु. २८,४३,५२३/- | नोटीस दिनांक २०-डिसेंबर-२३ मागणी रक्कम. रु. ५०,१७,५८३/- |
| दिनांक २२.१०.२६ रोजीची थकीत रक्कम | रु. २४,५८,१८५.३५/- (अक्षरी रुपये चोवीस लाख अठ्ठावन्न हजार एकशे पंच्याऐंशी आणि पस्तीस पैसे मात्र) | रु. ६२,३५,६१६.१८/- (अक्षरी रुपये बासष्ठ लाख पस्तीस हजार सहाशे सोळा आणि अठरा पैसे मात्र) |
| स्थावर मालमत्तेचे वर्णन | "द टाटा न्यू हेवन" या प्रकल्पातील कॉम्प्लेक्ट म्हणून ओळखल्या जाणाऱ्या अपार्टमेंट कॉम्प्लेक्सच्या ब्लॉक क्र. १ मध्ये ७ व्या मजल्यावर स्थित असलेल्या १०७४ क्रमांकाच्या, ५०२ चौ. फूट म्हणजेच ४६.६३ चौ. मीटर कार्पेट क्षेत्रफळ आणि ६५.७७ चौ. मीटर म्हणजेच ७०८ चौ. फूट सुपर बिल्ट-अप क्षेत्रफळ (ज्यामध्ये प्रमाणबद्ध सामायिक क्षेत्रांचा समावेश आहे) असलेल्या, विट्रिफाईड फ्लोअरिंगसह २ बेडरूमच्या अपार्टमेंट मालमत्तेचा सर्व तुकडा आणि पार्सल, सोबत १ कव्हर कार पार्किंग जागेचा वापर करण्याचा विशेष हक्क. | फ्लॅट क्र. ५०३, ५ वा मजला, ए विंग, ओशनिया, कासा रिओ गाव निळजे कल्याण शीळ रोड, डोंबिवली (पूर्व) जिल्हा ठाणे -४२१२०१ म्हणून वर्णन केलेल्या अकृषिक मालमत्तेचा सर्व तुकडा आणि पार्सल, क्षेत्रफळ ८७६ चौ. फूट |
| राखीव किंमत (रुपयांत) | ₹. 28,75,000/- | ₹. 36,90,000/- |
| ईएमडी | ₹. 2,87,500/- | ₹. 3,69,000/- |
| ई-लिलावाची तारीख आणि वेळ | 17/11/26 3:00 pm to 5:00 pm | 18/11/26 3:00 pm to 5:00 pm |
| ई-लिलाव पोर्टल | https://bankauctions.in | https://bankauctions.in |
| ईएमडी जमा करण्याची अंतिम तारीख | 16/11/26 | 17/11/26 |
| बोली वाढीची रक्कम (रुपयांत) | ₹. 25,000/- | ₹. 25,000/- |
| सुरक्षित धनकोला ज्ञात असलेला बोजा | ज्ञात नाही | ज्ञात नाही |
| मालमत्तेच्या तपासणीची तारीख | २६/१०/२६ ते १६/११/२६ पर्यंत कामकाजाच्या दिवशी सकाळी ९.३० ते सायंकाळी ५ च्या दरम्यान पूर्वभेटीची वेळ ठरवून | २६/१०/२६ ते १७/११/२६ पर्यंत कामकाजाच्या दिवशी सकाळी ९.३० ते सायंकाळी ५ च्या दरम्यान पूर्वभेटीची वेळ ठरवून |

सर्वसामान्य जनता आणि विशेषतः कर्जदार यांनी कृपया नोंद घ्यावी की, जर येथे नियोजित तारखेला लिलाव कोणत्याही कारणास्तव अयशस्वी झाला, तर सुरक्षित धनकोला त्यांच्या स्वतःच्या विवेकबुद्धीनुसार खाजगी कराराद्वारे विक्री करून सुरक्षा हिताची अंमलबजावणी करण्याचा अधिकार आहे. विक्रीच्या सविस्तर अटी आणि शर्तींसाठी, कृपया https://bankauctions.in आणि https://www.bajajfinserv.in/sarfaesi-auction-notices या लिंकला भेट द्या.

दिनांकः २७/१०/२६
ठिकाणः मुंबई
सही/- प्राधिकृत अधिकारी,
बजाज फायनान्स लिमिटे



### मरीनट्रान्स इंडिया लिमिटेड

सीआयएन : L35110MH2004PLC147139
**नोंदणीकृत कार्यालय** – ८०१/८०२, ८ वा मजला, विंध्या कमर्शियल कॉम्प्लेक्स, प्लॉट नं. १, सेक्टर ११, सीबीडी बेलापूर, ठाणे, नवी मुंबई, महाराष्ट्र, भारत – ४०० ६१४.
ई–मेल आयडी : compliance@marinetrans.in वेबसाइट : https://marinetrans.in

**दि. ३०.०९.२०२६ रोजी संपलेल्या सहामाहीकरिताच्या अलेखापरीक्षित वित्तीय निकालांचा अहवाल**

*(सर्व रकमा भारतीय रुपये लाखांत, वेगळे नमूद केलेले नसल्यास)*

| तपशील | ३०.०९.२०२६ रोजी संपलेली सहामाही (अलेखापरीक्षित) | ३१.०३.२०२६ रोजी संपलेली सहामाही (लेखापरीक्षित) | ३०.०९.२०२५ रोजी संपलेली सहामाही (अलेखापरीक्षित) | ३१.०३.२०२६ रोजी संपलेले वर्ष (लेखापरीक्षित) |
|---|---|---|---|---|
| १. परिचालनातून महसूल | ११,७१५.७५ | ७,०४४.४१ | ५,६८४.१० | १२,७२८.५१ |
| २. अन्य उत्पन्न | १४.८६ | २८.४६ | १५.८१ | ४४.२७ |
| **३. एकूण उत्पन्न (१ + २)** | ११,७३०.६२ | ७,०७२.८६ | ५,६९९.९१ | १२,७७२.७७ |
| **४. खर्च** | | | | |
| ए) थेट खर्च | ११,२२३.४२ | ६,६५८.९८ | ५,३३५.५० | ११,९९४.४८ |
| बी) कर्मचारी लाभ खर्च | १९४.९६ | २१४.५१ | १९३.६० | ४०८.११ |
| सी) वित्तीय मूल्य | ६५.३४ | ४४.४२ | ४३.४२ | ८७.८४ |
| डी) घसारा व कर्जमुक्ती खर्च | ८.३९ | ८.७५ | ८.८७ | १७.६२ |
| ई) अन्य खर्च | ९२.०१ | ९८.०८ | ६७.९८ | १६६.०६ |
| **५. एकूण खर्च** | ११,५८४.१२ | ७,०२४.७५ | ५,६४९.३८ | १२,६७४.११ |
| **६. करपूर्व नफा (३ – ५)** | १४६.५० | ४८.११ | ५०.५३ | ९८.६६ |
| **करखर्च:** | | | | |
| विद्यमान खर्च | ३६.९१ | १०.६१ | १७.४२ | २८.०३ |
| विभाजित खर्च | ७.६१ | –२.०९ | ०.५६ | –१.५३ |
| गत वर्षाचा खर्च | – | १०.८६ | १.७३ | १२.५९ |
| **७. एकूण कर खर्च** | ४४.५२ | १९.३८ | १९.७१ | ३९.०९ |
| **८. कालावधीकरिताचा नफा (६ – ७)** | १०१.९८ | २८.७२ | ३०.८२ | ५९.५६ |
| **९. अन्य सर्वसमावेशक उत्पन्न/(तोटा)** | | | | |
| १) नफा–तोट्यामध्ये पुनःवर्गीकृत न होणाऱ्या बाबी | | | | |
| ए) निश्चित लाभ आराखड्यावरील पुनःगणन लाभ /(हानी) | – | –०.४९ | –०.६६ | –१.१५ |
| बी) वरील घटकांवरील प्रभावी आयकर | – | ०.१३ | ०.१६ | ०.२९ |
| **१०. वर्षाकरिता एकूण सर्वसमावेशक उत्पन्न (८ + ९)** | १०१.९८ | २८.३६ | ३०.३३ | ५८.७० |
| **(वर्षाकरिताचा नफा व अन्य सर्वसमावेशक उत्पन्न यांचा समावेश)** | | | | |
| **११. उत्पन्न प्रतिशेअर (रु.)** | | | | |
| **प्रत्येकी रु. १०/– मूल्याचे समभाग** | | | | |
| ए) मूलभूत | ०.८० | ०.२३ | ०.२४ | ०.४६ |
| बी) सौम्यीकृत | ०.८० | ०.२३ | ०.२४ | ०.४६ |

टीपा :
१. कंपनीचे वरील वित्तीय निकाल हे कंपनी कायदा, २०१३ चे अनुच्छेद १३३ सहवाचन कंपन्या (भारतीय लेखा मानके) नियम, २०१५ , सुधारित याअंतर्गत विहित भारतीय लेखा मानकांनुसार तयार करण्यात आले आहेत.
२. भारतीय लेखा मानके (आयएनडी एएस) १०८ च्या आवश्यकतांनुसार, कंपनी प्राथमिकरीत्या एकाच व्यवसाय विभागात कार्यरत आहे. त्यामुळे वेगळी विभागीय माहिती पुरविण्यात आली नाही.
३. वरील निकालांचे लेखापरीक्षण समितीद्वारे पुनरावलोकन व शिफारस करण्यात आली असून तत्पश्चात संचालक मंडळाद्वारे त्यांच्या दि. २६.१०.२०२६ रोजी आयोजित सभेत त्यांना मंजुरी देण्यात आली आहे. सदर निकाल हे वैधानिक लेखापरीक्षकांच्या मर्यादित पुनरावलोकनाच्या अधीन आहेत ज्यांनी असुधारित पुनरावलोकन निर्णय व्यक्त केला आहे.
४. अनुषंगिक गत कालावधी/वर्षाकरिताची आकडेवारी आवश्यकतेनुसार पुनर्गठित/पुनःवर्गीकृत करण्यात आली आहे.

मरीनट्रान्स इंडिया लिमिटेडच्या
संचालक मंडळाकरिता व त्यांच्या वतीने
सही/–
तीरजकुमार बाबू कोटियन
संचालक
डीआयएन : ०००२२२९४

ठिकाण : नवी मुंबई
दिनांक : २६.१०.२०२६



### PUBLIC NOTICE

Notice is hereby given that SHRI. GOSWAMEY DEVKINANDANACHARYA VENUGOPAL & SMT. GOSWAMEY RAJESHWARI DEVKINANDANACHARYA are the joint and absolute owners of Flat No.1505 and 1506, on 15th Floor, (after re-development of the Society), in the Building known as "MADHUBAN HEIGHTS" in NEW MADHUBAN CO-OPERATIVE HOUSING SOCIETY LTD., situated at M.G. Cross Road No.4, Behind Patel Nagar, Kandivali (West), Mumbai-400 067, (hereinafter referred to as "THE SAID FLATS") and SHRI. GOSWAMEY DEVKINANDANACHARYA VENUGOPAL & SMT. GOSWAMEY RAJESHWARI DEVKINANDANACHARYA are the bonafide members of NEW MADHUBAN CO-OPERATIVE HOUSING SOCIETY LTD., bearing it's Registration No. BOM/WR/HSG/TC5161 OF 18-08-90 DTD. 18/08/1990 (hereinafter referred to as "THE SAID SOCIETY"). Previously before re-development of the society, my clients SHRI. GOSWAMEY DEVKINANDANACHARYA VENUGOPAL & SMT. GOSWAMEY RAJESHWARI DEVKINANDANACHARYA were the joint and absolute owners of Flat No. B/401 on 4th Floor, in the Building known as "MADHUBAN", situated at New 44' ft. D.P. Road, Off. M.G. Cross Road No. 4, Kandivali (West), Mumbai -400 067. The Promoters/Builders viz. M/s. JAYANTILAL INVESTMENTS sold and transferred the Flat No. B/401, on 4th Floor, "MADHUBAN", situated at New 44' ft. D.P. Road, Off. M.G. Cross Road No. 4, Kandivali (West), Mumbai - 400 067, to SHRI. HEMANG M. VORA & SHRI. CHIRAG M. VORA vide an Agreement for Sale dated 28th June, 1989 and thereafter the said SHRI. HEMANG M. VORA & SHRI. CHIRAG M. VORA sold and transferred the aforesaid Flat No. B/401 to SHRI. GOSWAMEY DEVKINANDANACHARYA VENUGOPAL & SMT. GOSWAMEY RAJESHWARI DEVKINANDANACHARYA vide a registered Agreement for Sale dated 3rd August, 1995 at Sr. No. BDR-2/4129/1996 along with Deed of Confirmation dated 25th July, 1996 with the Office of the Sub-Registrar of Assurances, Borivali, Mumbai Suburban District. The previous one of original chain Agreement viz. Agreement for Sale dated 28th June, 1989 made and entered into between M/s. JAYANTILAL INVESTMENTS and SHRI. HEMANG M. VORA & SHRI. CHIRAG M. VORA in respect of the said Flat No. B/401 has been lost/misplaced in transit. My clients SHRI. GOSWAMEY DEVKINANDANACHARYA VENUGOPAL & SMT. GOSWAMEY RAJESHWARI DEVKINANDANACHARYA desire to sale the aforesaid Flat No.1505 and 1506, on 15th Floor, in the Building known as "MADHUBAN HEIGHTS" in NEW MADHUBAN CO-OPERATIVE HOUSING SOCIETY LTD., to any Prospective Buyer/s.
If any person/s having any claim, right, title and interest of whatsoever nature over the same by way of sale, mortgage, lien, exchange, inheritance, trust, maintenance, adverse, possession, lease, leave and licence, lien or otherwise howsoever are hereby required to make known to the undersigned Advocate within 14 days from the date of publication with documentation proof in writing or legal evidence and after expiry of 14 days notice period, any claim from any person or public will not be entertained.

**PLACE : MUMBAI., DATED : 27/10/2026**
**BHAVYA LAW AND ASSOCIATES,**
**SANTOSH K. SINGH, Advocate**
D/203, "34 Park Estate", Yashwant Nagar, Behind Teen Dongari, Near Ganpati Temple, Goregaon (West), Mumbai- 400104..



motilal oswal Home Finance

### मोतीलाल ओसवाल होम फायनान्स लिमिटेड

**मागणी नोटीस**

नोंदणीकृत कार्यालयः मोतीलाल ओसवाल टॉवर, रहिमतुल्ला सयानी रोड, परळ एसटी डेपो समोर, प्रभादेवी, मुंबई - ४०० ०२५, सीएसः ८२९१८८९८९८ वेबसाइटः www.motilaloswalhf.com , ई-मेलः hfquery@motilaloswal.com

सिक्युरिटायझेशन अँड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शियल ॲसेट्स अँड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट कायदा, २००२ ("कायदा") आणि सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) नियम, २००२ ("नियम") च्या तरतुदींअंतर्गत.
खालील स्वाक्षरीकर्ते हे मोतीलाल ओसवाल होम फायनान्स लिमिटेड (एमओएचएफएल) चे या कायद्यांतर्गत प्राधिकृत अधिकारी असून, त्यांनी नियम ३ सह वाचल्या जाणाऱ्या कायद्याच्या कलम १३(१२) अंतर्गत प्रदान केलेल्या अधिकारांचा वापर करून, कायद्याच्या कलम १३(२) अंतर्गत मागणी नोटीस/नोटिसा बजावली/बजावल्या आहेत, ज्याद्वारे खालील कर्जदाराला/कर्जदारांना सदर नोटीस प्राप्त झाल्याच्या तारखेपासून ६० दिवसांच्या आत संबंधित नोटिशीमध्ये नमूद केलेल्या रकमेची परतफेड करण्यास सांगितले आहे. खालील स्वाक्षरीकर्त्यांना असे रास्तपणे वाटते की कर्जदार मागणी नोटिशीची/नोटिसांची बजावणी टाळत आहे/आहेत, म्हणून नियमांनुसार नोटीस चिकटवून आणि प्रसिद्ध करून नोटिशीची बजावणी केली जात आहे. मागणी नोटिशीचा/नोटिसांचा मजकूर खालीलप्रमाणे उद्धृत केला आहेः

| अ. क्र. | कर्ज करार क्र. /कर्जदार / सह-कर्जदार / सह-अर्जदार / जामीनदार यांचे नाव | मागणी नोटीसची तारीख आणि थकीत रक्कम | स्थावर मालमत्तेचे वर्णन |
|---|---|---|---|
| १. | LXMAH00416-170025432 कर्जदारः सुधाकर पद्मनाभन चोलाईल सह-कर्जदारः नीना सुधाकर चोलाईल | १२-१०-२०२६ / रु. ३,७३,२५१/- (अक्षरी रुपये तीन लाख त्र्याहत्तर हजार दोनशे एकावन्न मात्र) | ग्रामपंचायत घर क्र. १०८, क्षेत्रफळ ५३२ चौ. फूट बिल्ट अप, गाव बिरवाडी, तालुका महाड, जिल्हा रायगड |

कर्जदारांना याद्वारे सल्ला दिला जातो की त्यांनी मागणी नोटिशीचे/नोटिसांचे पालन करावे आणि त्यामध्ये व वर नमूद केलेली मागणी रक्कम, ही नोटीस प्रसिद्ध झाल्याच्या तारखेपासून ६० दिवसांच्या आत, पेमेंट प्राप्त होईपर्यंतच्या लागू व्याज, अतिरिक्त व्याज, बाऊन्स प्रभार, खर्च आणि व्ययासह भरावी. कर्जदारांनी कृपया नोंद घ्यावी की एमओएचएफएल ही एक सुरक्षित धनको आहे आणि कर्जदारांनी प्राप्त केलेली कर्ज सुविधा ही कर्जदारांनी गहाण ठेवलेल्या सुरक्षित मालमत्ता असलेल्या स्थावर मालमत्तेवर/मालमत्तांवर सुरक्षित कर्ज आहे.
जर कर्जदार ठरलेल्या मुदतीत त्यांची दायित्वे पूर्णपणे पार पाडण्यात अपयशी ठरले, तर एमओएचएफएल ला कायद्याच्या कलम १३(४) अंतर्गत सुरक्षित मालमत्तेचा ताबा घेण्याचे सर्व अधिकार वापरण्याचा हक्क असेल, ज्यामध्ये विक्रीद्वारे मालमत्ता हस्तांतरित करण्याचा किंवा कायदा आणि त्याअंतर्गत असलेल्या नियमांनुसार उपलब्ध असलेल्या इतर कोणत्याही उपायांचा वापर करून पेमेंट वसूल करण्याचा अधिकार समाविष्ट आहे, परंतु तो त्यापुरताच मर्यादित नाही. विक्री किंवा हस्तांतरणाचा अधिकार लागू करण्यापूर्वी सुरक्षित मालमत्ता जप्त आणि/किंवा सील करण्याचा अधिकार देखील एमओएचएफएल ला आहे. सुरक्षित मालमत्तेच्या विक्रीनंतर, जर गहाण ठेवलेल्या मालमत्तांचे मूल्य एमओएचएफएल ला देय असलेल्या रकमेची परतफेड करण्यासाठी अपुरे असेल, तर उर्वरित थकबाकी वसूल करण्यासाठी स्वतंत्र कायदेशीर कार्यवाही सुरू करण्याचा अधिकार देखील एमओएचएफएल ला आहे. हा उपाय इतर कोणत्याही कायद्यांतर्गत एमओएचएफएल ला उपलब्ध असलेल्या इतर सर्व उपायांच्या व्यतिरिक्त आणि स्वतंत्र आहे.
कर्जदारांचे लक्ष सुरक्षित मालमत्ता सोडवून घेण्यासाठी उपलब्ध असलेल्या वेळेच्या संदर्भात कायद्याच्या कलम १३(८) कडे वेधण्यात येत आहे आणि तसेच कायद्याच्या कलम १३(१३) कडे वेधण्यात येत आहे, ज्याद्वारे कर्जदारांना एमओएचएफएल च्या पूर्व लेखी संमतीशिवाय सुरक्षित मालमत्तेची विल्हेवाट लावण्यास किंवा व्यवहार करण्यास, किंवा विक्री, भाडेपट्टा किंवा इतर कोणत्याही मार्गाने (व्यवसायाच्या सामान्य ओघाव्यतिरिक्त) सुरक्षित मालमत्ता हस्तांतरित करण्यास मनाई/प्रतिबंध करण्यात आला आहे आणि वरील तरतुदीचे पालन न करणे हा सदर कायद्याच्या कलम २९ अंतर्गत शिक्षापात्र गुन्हा आहे. मागणी नोटिशीची प्रत खालील स्वाक्षरीकर्त्यांकडे उपलब्ध आहे आणि कर्जदारांची इच्छा असल्यास, ते सामान्य कार्यालयीन वेळेत कोणत्याही कामकाजाच्या दिवशी ती स्वाक्षरीकर्त्यांकडून प्राप्त करू शकतात.

ठिकाणः महाराष्ट्र
दिनांकः २७.१०.२०२६
**भाषांतरामध्ये त्रुटी आढळल्यास इंग्रजी मजकूर ग्राह्य धरण्यात येईल.**
**सही/- प्राधिकृत अधिकारी,**
**(मोतीलाल ओसवाल होम फायनान्स लिमिटेड)**



FEDBANK FINANCIAL SERVICES LIMITED

### फेडबँक फायनान्शियल सर्व्हिसेस लिमिटेड

**ताबा नोटीस**

नोंदणीकृत कार्यालयः युनिट क्र. ११०१, ११ वा मजला, सिग्नस, प्लॉट क्र. ७१ ए, पवई, पासपोली, मुंबई - ४०००८७

ज्याअर्थी, खालील स्वाक्षरीकर्ते हे फेडबँक फायनान्शियल सर्व्हिसेस लिमिटेडचे प्राधिकृत अधिकारी असून, त्यांनी सिक्युरिटायझेशन अँड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शियल ॲसेट्स अँड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट कायदा, २००२ (२००२ चा ५४) अंतर्गत आणि सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) नियम, २००२ च्या नियम ३ सह वाचल्या जाणाऱ्या कलम १३ (१२) अंतर्गत प्रदान केलेल्या अधिकारांचा वापर करून, खाली नमूद केलेली मागणी नोटीस बजावली होती, ज्याद्वारे खालील कर्जदारांना सदर नोटीस प्राप्त झाल्याच्या तारखेपासून ६० दिवसांच्या आत याखाली नमूद केलेल्या रकमेची परतफेड करण्यास सांगितले होते. खालील कर्जदार सदर रकमेची परतफेड करण्यात अपयशी ठरल्यामुळे, याखालील कर्जदारांना आणि सर्वसामान्य जनतेला याद्वारे नोटीस दिली जात आहे की खालील स्वाक्षरीकर्त्यांनी सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) नियम, २००२ च्या नियम ८ सह वाचल्या जाणाऱ्या कायद्याच्या कलम १३ च्या पोट-कलम (४) अंतर्गत प्रदान केलेल्या अधिकारांचा वापर करून खाली वर्णन केलेल्या मालमत्तेचा ताबा घेतला आहे.

**कर्ज खाते क्र. (एलएएन) / कर्जदार / सह-कर्जदार / जामीनदार -**

**१. कर्ज खाते क्र. FEDKCSSTL0493072; (१) आरिफ हुसेन अहमद हुसेन अन्सारी (कर्जदार); (२) तन्झिला बानो आरिफ हुसेन अन्सारी (सह-कर्जदार);**
**मागणी नोटीसची तारीख आणि रक्कम - २६/०४/२०२४, रक्कमः दिनांक २३/०४/२०२४ रोजीच्या स्थितीनुसार रु. २२,३५,१५०.१०/- (अक्षरी रुपये बावीस लाख पस्तीस हजार एकशे पन्नास आणि दहा पैसे मात्र)**
**ताब्याची तारीख आणि प्रकारः २१-१०-२०२६ आणि प्रत्यक्ष ताबा**
**स्थावर मालमत्तेचे वर्णन - ठाणे जिल्ह्यातील गाव निझामपुरा, तालुका भिवंडी - ४२१३०२ येथे स्थित, अंतिम प्लॉट क्र. ४८, सीटीएस क्र. ७३३ पैकी आणि ७४३ पैकी धारण करणाऱ्या एन.ए. (अकृषिक) जमिनीवर बांधलेली, साधारणपणे "नझीर पॅलेस" म्हणून ओळखली जाणारी इमारत, ज्याचा एम.एच. क्र. ५१-ए आहे, त्या इमारतीच्या १ ल्या मजल्यावरील ५७५ चौ. फूट म्हणजेच ५३.४३ चौ. मीटर बिल्ट-अप क्षेत्रफळ असलेला निवासी फ्लॅट क्र. १०४ चा सर्व भाग. मालमत्तेची चतुःसीमाः उत्तरेसः रस्ता; दक्षिणेसः रस्ता; पूर्वेसः ग्रीन पाल; पश्चिमेसः भूमी कॉम्प्लेक्स**

विशेषतः कर्जदार आणि सर्वसामान्य जनतेला याद्वारे सावध करण्यात येते की त्यांनी मालमत्तेशी कोणताही व्यवहार करू नये आणि मालमत्तेशी केलेला कोणताही व्यवहार हा येथे वर नमूद केलेली रक्कम आणि त्यावरील व्याजासाठी फेडबँक फायनान्शियल सर्व्हिसेस लिमिटेड च्या प्रभाराच्या अधीन राहील. सुरक्षित मालमत्ता सोडवून घेण्यासाठी उपलब्ध असलेल्या वेळेच्या संदर्भात कर्जदाराचे लक्ष कायद्याच्या कलम १३ च्या पोट-कलम (८) च्या तरतुदींकडे वेधण्यात येत आहे.

**ठिकाणः ठाणे**
**दिनांकः २१-१०-२०२६**
**सही/- (प्राधिकृत अधिकारी)**
**फेडबँक फायनान्शियल सर्व्हिसेस लिमिटेड**



### जाहीर नोटीस

याद्वारे सर्वसामान्य जनतेला **सोनिया प्रेम सीएचएसएल लिमिटेड,** (ज्याला यापुढे "सोसायटी" असे संबोधले जाईल) नोंदणी क्र. बीओएम (डब्ल्यूआर) एचएसजी (टीसी) ११०० ऑफ १९८४-८५, ज्याचा पत्ता प्रेम नगर बिल्डिंग क्र. ९, एस.व्ही.पी. रोड, बोरीवली (पश्चिम), मुंबई ४०० ०९२ येथे आहे, त्यांच्या वतीने नोटीस देण्यात येते की, सदर सोसायटीच्या इमारतीमधील फ्लॅट क्र. ए-४०१ हा **श्रीमती पल्लवी विजय व्होरा आणि श्री. विजय कांतीलाल व्होरा** यांनी पूर्वीचे सदस्य **श्री. जगदीश कुमार कांतीलाल मधानी** यांच्याकडून विक्री करारान्वये खरेदी केला होता आणि त्यानुसार, सोसायटीने दिनांक २३.८.१९९३ रोजीच्या शेअर प्रमाणपत्र क्र. २५ मध्ये, ज्याचे विशिष्ट क्रमांक १२१ ते १२५ आहेत, सदर श्रीमती पल्लवी विजय व्होरा आणि श्री. विजय कांतीलाल व्होरा यांच्या संयुक्त नावांची नोंद केली होती.
बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या आरोग्य विभागाने जारी केलेल्या त्यांच्या मृत्यू प्रमाणपत्रानुसार, सदर **श्री. विजय कांतीलाल व्होरा** यांचे दिनांक ०३.०४.२०१३ रोजी मृत्युपत्र न करता निधन झाले.
त्यांची पत्नी / विधवा असल्याचा दावा करत, **श्रीमती पल्लवी विजय व्होरा** यांनी सोसायटीला कळवले आहे की त्या दिवंगत श्री. विजय कांतीलाल व्होरा यांच्या एकमेव जिवंत वारस आणि कायदेशीर प्रतिनिधी आहेत आणि त्यानुसार, सदर श्री. विजय कांतीलाल व्होरा यांनी मागे सोडलेला ५०% वारसा त्यांच्या एकट्या नावावर हस्तांतरित करण्याची विनंती त्यांनी सोसायटीला केली आहे, ज्यामुळे त्या सदर सोसायटीतील सदर फ्लॅट क्र. ए-४०१ च्या संदर्भात एकमेव १००% सदस्य बनतील.
सोसायटीमधील फ्लॅट क्र. ए-४०१ च्या संदर्भात सदर **श्रीमती पल्लवी विजय व्होरा** यांच्या बाजूने १००% शेअर्स हस्तांतरित करण्याबाबत, सदर दिवंगत **श्री. विजय कांतीलाल व्होरा** यांच्या माध्यमातून दावा करणाऱ्या कोणाकडूनही लेखी स्वरूपात दावे आणि/किंवा आक्षेप मागविले जात आहेत.
ही नोटीस जारी केल्यापासून १४ दिवसांच्या कालावधीत सोसायटीला लेखी स्वरूपात कोणतेही दावे आणि/किंवा आक्षेप प्राप्त न झाल्यास, दावा, जर काही असल्यास, तो सोडून दिला आहे असे मानले जाईल आणि सोसायटी सदर **श्रीमती पल्लवी विजय व्होरा** यांना सोसायटीमधील फ्लॅट क्र. ए-४०१ च्या संदर्भात एकमेव सदस्यत्व देण्याची कार्यवाही करेल.
**सोनिया प्रेम सीएचएसएल लिमिटेड** च्या सूचनेनुसार

सही/-
**दिनेश मालेकर**
(वकील)
ठिकाणः मुंबई
दिनांकः २७/१०/२०२६
बी/१०६, बोरीवली शॉपिंग सेंटर, चंदावरकर रोड, बोरीवली (पश्चिम), मुंबई-४०००९२,